# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १८६-२२ दिनांक :- १७/०६/२०२२

## १० वर्षापुर्वी खुनासह दरोडा टाकणाऱ्या पाहिजे आरोपीतास पकडण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.

दिनांक ०१/०२/२०१२ रोजी इसम नामे मोहम्मद नुरहसर खान, वय. ४५ वर्ष, रा. वरडीया, ता. पालेज, जि. भरुच, राज्य गुजरात हे त्यांचे ताब्यातील ट्रकमध्ये एकुण १४ टन ९१० किलो ग्रॅम स्टेनलेस स्टील रॉड असे २५ लाख रुपये किंमतीचा माल भरुन रबाळे येथे घेऊन जात असताना अज्ञात आरोपीतांनी आपसात संगणमत करुन मोहम्मद खान यांचे ताब्यातील ट्रकमध्ये भरलेला लोखंडी स्टील रॉड माल तवेरा गाडीचा वापर करुन सदरचा ट्रक अडवुन मोहम्मद खान यांना खाली उतरवुन त्यांचे हातपाय दोरीने बांधुन तवेरा गाडीत घालुन ठोध्याबुक्याने, लाकडी दांडक्याने डोक्यावर, चेह-यावर, हातापायावर ठिकठिकाणी मारहाण व गंभीर दुखापती करुन त्यास जिवे ठार मारुन गवराईपाडा महेंद्रनगर येथील निर्जनस्थळी आणुन त्याचे प्रेत टाकून दिले. तसेच मोहम्मद खान यांचे ताब्यातील ट्रकमधील लोखंडी स्टील रॉड हा माल खुनासह दरोडा घालुन चोरी करुन नेला होता त्याबाबत वालीव पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १५/२०१२ भा.द.वि.सं.क. ३९६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरच्या गंभीर व क्लीष्ट गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे अब्दुला अलीमुल्ला चौधरी याचा यापुर्वी सर्वोतोपरी शोध घेऊन तो गेल्या १० वर्षापासुन मिळुन येत नव्हता. त्याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी गंभीर व संवेदनशील गुन्हयातील पाहीजे आरोपींचा शोध घेणेबाबत आदेश केले होते. त्याअनुषंगाने गुन्हे शाखेच्या मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सदर गुन्हयाची वालीव पोलीस ठाणेकडून सविस्तर माहिती घेऊन यातील पाहिजे आरोपी याचेबाबत सखोल गोपनीय माहीती प्राप्त करुन सलग ०५ दिवस धानीव बाग परिसरात मुक्काम ठोकुन, दिवस-रात्र पायी गस्त करुन व तांत्रिक विश्लेषनाव्दारे आरोपीचा धानीव बाग येथील येण्या-जाण्याचा मार्ग निश्चित केला. त्या मार्गावर सापळा लावुन व छापा टाकुन पाहीजे आरोपी अब्दुला अलीमुल्ला चौधरी, वय. ३६ वर्ष, रा. रुम नं. ७२३३, आर.के.जी. कम्पाऊन्ड, नवजीवन, शांतीनगर, धानीव रोड, वसई, जि. पालघर यास दिनांक १६/०६/२०२२ रोजी ताब्यात घेवून त्याचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने विचारपुस केली असता त्याचा गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर आरोपीतास पुढील कारवाई करीता वालीव पोलीस ठाणे यांच्या ताब्यात दिले असता त्यास अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री. विजयकांत सागर, पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय), अती. कार्य पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पो.नि. राहुल राख, सपोनि/अमोल आंबवणे, सपोनि/दत्तात्रय सरक, पोहवा/शिवा पाटील, गोविंद केंद्रे, पोना/राजाराम काळे, संग्राम गायकवाड यांनी केलेली आहे.

------------ooooo------------